PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Ashi Hi Banwa Banwi
Year: 1989

Song: Ashi Hi Banwa Banwi
Lyricist: Sudhir Moghe

बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी

साडी अशी नेसू
नी गालावर हसू
ज्याला जसे हवे
या तसे तसे दिसू
भीती वाटे मला
की कुठेतरी फसू
जो डरे तो मरे
या दुनियेची रीत अशी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी

चंद्रमुखी दिसतेस अशी
तुझी माझी ही जोडी
गं किती किती छान छान
ये सजणी जवळी सजुनी
तू किती गं नाजूक
गोरी गोरी गोरी पान
चंद्रमुखी दिसतेस अशी
तुझी माझी ही जोडी
गं किती किती छान छान
ये सजणी जवळी सजुनी
तू किती गं नाजूक
गोरी गोरी गोरी पान

मी तर रंभा उर्वशी
तू रे इस्पिकचा राजा
मी तर रंभा उर्वशी
तू रे इस्पिकचा राजा
हो असल्या शृंगारानं तू
आमचा वाजवीला बाजा
मी तर रंभा उर्वशी
तू रे इस्पिकचा राजा

याची टोपी त्याला
नी त्याची टोपी याला
कळे ना हे ज्याला
तो पुरता बुडाला
लोक भूलताती
या वरल्या रंगाला
जो खोटं करी खरं
त्याला दुनिया सलाम करी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी

तू नवरी कशी गं जबरी

Literacy for a Billion

राजी खुशीनं गोडीनं
माझं सारं मान मान
मी नवरा दिसतो भंवरा
तुझ्या कुंकवाचं ठेव बाई
थोडं तरी भान भान
तू नवरी कशी गं जबरी
राजी खुशीनं गोडीनं
माझं सारं मान मान
मी नवरा दिसतो भंवरा
तुझ्या कुंकवाचं ठेव बाई
थोडं तरी भान भान

नको रे रागानं
बोलू मनमोहना
राधा प्रीतीची मी बावरी
होय बावरी
चल रे आनंदी
संसार मांडूया
नवरी लाडाची मी
नवरी लाडाची मी
नवरी लाडाची मी
लाजरी हाय लाजरी
आउ
हे नाचू खेळू गाऊ

नी मजेमध्ये राहू
उन्हाळा हिवाळा
हो आम्ही सारे साहू
जिथे जिथे जाऊ
तिथे चलाखी ही दावू
सुखासाठी जगामध्ये
इथे तिथे चाले अशी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी

साडी अशी नेसू
नी गालावर हसू
ज्याला जसे हवे
या तसे तसे दिसू
भीती वाटे मला
की कुठेतरी फसू
जो डरे तो मरे
या दुनियेची रीत अशी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी
बनवा बनवी
अशी ही बनवा बनवी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*